MAH MAR 34737/13/1/2009-TC
ISSN 2231-573X
UGC Care Listed Journal



कुळवाडी-भूषण पवाडा गातो भोसल्याचा ।
छत्रपती शिवाजीचा ।।धु०।।
लंगोटयांस देई जानवीं पोवींदा कुणब्याचा ।
काल तो असे यवनांचा ।।
शिवाजीचा पिता शहाजी पुत्र मालोजीचा ।
असे तो डौल जाहागिरीचा ।।
पंधराशें एकुणपन्नास साल फळलें ।
जुन्नर ते उदयासी आलें ।।
शिवनेरी किल्ल्यामध्यें बाळ शिवाजी जन्मलें ।
जिजीबाईस रत्न सांपडलें ।।
हातापायांची नखें बोटें शुभ्र प्याजी रंगीलें ।
ज्यांनीं कमळा लाजिवलें ।।
वरखालीं टिर्यांस पोटर्या गांठी गोळे बांधले ।
स्फटिकापरि भासले ।।
सान कटी सिंहापरी छाती मांस दुनावलें ।
नांव शिवाजी शोभलें ।।

- महात्मा जोतिराव फुले



# तिफण



कुळवाडीभूषण
## छत्रपती शिवाजी महाराज
विशेषांक

| | | |
|---|---|---|
| 164. | छत्रपती शिवाजी महाराजांचा स्त्रीविषयक दृष्टीकोन : विशेष संदर्भ 'रायबगीण'<br>- डॉ. संतोष अभिमन्यू जेठीथोर | 623 - 625 |
| 165. | इतिहास व विचारप्रणाली : छत्रपती शिवाजी महाराजांचा प्रतिमा शोध<br>- डॉ. कृष्णा महादेव पाटील | 626 - 628 |
| 166. | आज्ञापत्र आणि म.फुले विरचित पवाड्यातील छत्रपती शिवाजी महाराजांची प्रतिमा : एक शोध<br>- डॉ. दया जेठे | 629 - 634 |
| 167. | छत्रपती शिवाजी महाराज यांचे व्यापारविषयक धोरण<br>- प्रा. अक्षय अशोकराव गवळी | 635 - 637 |
| 168. | आधुनिक भारताचे मार्गदर्शक छत्रपती शिवाजी महाराज- एक अभ्यास<br>- रमेश बापूराव जोगदंड | 638 - 640 |
| 169. | शिवरायांना समजून घेताना<br>- अमृत साळुंखे | 641 - 642 |
| 170. | छत्रपती शिवाजी महाराज यांचे राजव्यवहार शेती व भाषिक धोरण<br>- डॉ. व्यंकटी नागरगोजे | 643 - 645 |
| 171. | छत्रपती शिवाजी महाराजांचे आर्थिक नियोजन<br>- प्रा. डॉ. मधूकर बाबूराव अनंतकवळस | 646 - 650 |
| 172. | छत्रपती शिवाजी महाराजांची शेती व शेतकविषयीची भूमिका<br>- डॉ. सोमीनाथ सारंगधर खाडे | 651 - 653 |
| 173. | छत्रपती शिवाजी महाराजांची व्यवस्थापनशास्त्र विषयक भूमिका<br>- सत्यशीला उत्तमराव तौर | 654 - 656 |



# शिवरायांना समजून घेताना

- अमृत साळुंखे
इतिहास विभाग
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
८८३००३६०८९, ८४८५०३८२९४

प्रचलित व्यवस्था बदलून तत्कालीन समाजाला नवीन दिशा छत्रपती शिवाजी महाराजांनी दाखवली. शिवपूर्वकाळामध्ये महाराष्ट्र संघर्षाचे क्षेत्र बनला होता. सततच्या युद्धांमुळे सर्वसामान्य रयत भरडून निघाली होती. महाराजांनी आपली सगळी उमेद या रयतेच्या कल्याणासाठी खर्ची घातली. रयतही महाराजांसाठी सर्वस्व झोकण्यास तयार होती, याचे कारण छत्रपती शिवाजी महाराजांचे सर्वांना आपले वाटणारे व्यक्तिमत्त्व.

लोककल्याणकारी धोरणे राबवताना महाराजांच्या आदर्शाची सद्यःस्थितीत आवश्यकता आहे.

शिवराय कोणा एका जातीचे, धर्माचे, पंथाचे नाहीत. आपण त्यांना वैयक्तिक अस्मितांमध्ये कैद केले आहे. यामुळे शिवाजी महाराजांचे कार्य योग्य पद्धतीने लोकांपर्यंत पोहोचत नाही. आधुनिक काळामध्ये शिवाजी महाराजांची शिकवण लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे. धर्म, जाती, पंथ यांना जोडण्याची छत्रपती शिवाजी महाराजांची भूमिका असताना धर्माला तोडण्याच्या भूमिकेत विविध घटक महाराजांचे चरित्र उभारत आहेत, ही खेदजनक गोष्ट आहे.

शिवाजी महाराजांनी विविधतेला सन्मान दिला. मग ते धर्म, जाती, वर्ण, विविध पंथ असतील त्यांचा महाराजांनी नेहमीच आदर केला आहे. हे सध्या घडत नाही. स्वार्थासाठी आपल्याला महाराजांची विविधता नको आहे. एकाच पद्धतीचे विचार ऐकण्याचे, बोलण्याचा अट्टहास निर्माण होत आहे. यातून ऐक्य असणाऱ्या समाजाची निर्मिती घडेल काय? याविषयी चिंतन होण्याची गरज आहे.

वेगवेगळ्या विचारधारा महाराजांवर थोपवता कामा नयेत. विभिन्न दृष्टिकोनातून अभ्यास करताना तत्कालीन समाजव्यवस्था आणि त्या अनुषंगाने महाराजांनी घेतलेले निर्णय यांचा परिस्थितीसापेक्ष विचार केला जावा. आधुनिक काळातील संकल्पनांचा आधार घेऊन शिवचरित्रातील घटनांचा अन्वयार्थ लावणे योग्य ठरणार नाही. तत्कालीन जग आणि त्यातील महाराजांचे दूरदृष्टीत्व लक्षात घेऊन महाराजांच्या युगकार्याला न्याय दिला पाहिजे. शिवाजी महाराजांनी आधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज असलेल्या परकीयांना पश्चिम किनारपट्टीवर विरोध केला. त्यांना नियंत्रित ठेवले.

छत्रपती शिवाजी महाराजांनी त्यावेळी स्वराज्यात जी उपलब्ध साधने होती त्यांचा व्यवस्थित वापर केलेला आहे. महाराजांनी स्वराज्यातील सर्वसामान्य माणसांसाठी संपत्तीसाधने विकसित केली. व्यापारवाढीसाठी प्रयत्न केला. तत्कालीन समाजाची अवस्था पाहिली असता, कौशल्याच्या अभावामुळे रोजगार नाही, हे महाराजांनी ओळखून पावले टाकली. नवनवीन गोष्टी शिकण्याचा प्रयत्न केला. यामुळे गरिबी आणि गुलामी नाहीशी होऊन, प्रत्येकाला आत्मसन्मानाने जगता येईल. हा विचार छत्रपती शिवाजी महाराजांचा होता.

शिवजन्मोत्सवाच्या निमिताने सार्वजनिक ठिकाणी फ्लेक्सबाजी, कर्णकर्कश संगीतावर मद्यधुंद होऊन नाचणे. यातून शिवचरित्र भविष्यातील पिढ्यांसाठी प्रेरणादायी ठरू शकेल काय? आपण या उदाहरणांमधून समाजास दिशा देऊ शकतो का? हल्ली

समाजमाध्यमांमध्ये स्टेट्स, छोटे-छोटे व्हिडिओ परिणामकारक असतात. किंबहुना नवीन पिढीचा कलही इकडेच आहे. सरासरी पाहिले तर या माध्यमांतून महाराजांबद्दल कोणती प्रतिमा असते. बहुतांशी स्टेट्स कसे असतात? यातली भाषा भडक असते. चटकदार, चमकदार गोष्टींचा ऊदोऊदो करून या गोष्टींचे अनुकरण करून नेमका काय संदेश देत आहोत याचा विचार करण्याची आता वेळ आलेली आहे. शिवरायांचे कार्य विधायक पद्धतीने पुढे गेले

पाहिजे. बाकीचा झगमगाटावरील खर्च कमी करून आपण लोकसहभागातून महाराजांचे कार्य पुढे नेण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. महाराष्ट्राचे वैभव असलेल्या ऐतिहासिक वास्तू, गडकोट यांची अवस्था वाईट आहे. आपले हे सांस्कृतिक, वैचारिक, ऐतिहासिक संचित वाचवण्यासाठी लोकसहभागातून यांच्या जतन आणि संवर्धनासाठी प्रयत्न केले पाहिजेत.

घराघरांत महाराजांच्या प्रतिमा लावत असताना त्या कोणत्या प्रकारच्या असतात. त्यातील भव्य भपकेबाज प्रदर्शन हे योग्य आहे का? छत्रपती शिवाजी महाराजांनी संपत्तीचे कधीही प्रदर्शन केले नाही. मोठमोठे महाल उभारले नाहीत. कधी मैफिली झाल्याची उदाहरणे शिवकाळातील साधनांमध्ये येत नाहीत. मोहिमांमध्ये नाच-गाण्याचे कार्यक्रम तर चुकूनही झाले नाहीत. भपकेबाजपणा, टोलेजंग वाडे, संपत्तीचे प्रदर्शन यांचे सिरिअल, सिनेमे, इत्यादी माध्यमातून महाराजांच्या व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घडविले जाते ते योग्य आहे का? याचाही सारासार विचार होण्याची गरज आहे. चैनबाजी, शानोशौकत यात महाराजांनी आयुष्य नाही घालवले. सर्वसामान्य लोकांच्या भल्यासाठी त्यांनी आपले सर्व आयुष्य आणि संपत्ती खर्ची घातली. शिवाजी महाराजांच्या सैन्याचा संपूर्ण पाया आणि पार्श्वभूमी ही शोषित आणि कष्टकरी समाजातील होती आणि म्हणूनच जो-जो शेतकऱ्यांचा विरोधक आहे, तो स्वकीय असो की परकीय अगदी गावगाड्यातील वतनदार पाटील, कुलकर्णी असो, त्याच्याविरुद्ध शिवाजीराजांनी संघर्ष केला. शिवरायांच्या विचारांची गरज आज खऱ्याअर्थाने तरुण पिढीला आहे. त्यांच्या कार्याकडे पाहिले असता छत्रपती शिवाजी महाराजांच्या उद्योगीवृत्ती, अविरत कार्यरतपणा, सृजनात्मकता, प्रेम, वात्सल्य, दूरदृष्टी या गुणांची गरज आजच्या पिढीला आहे.

शिवचरित्राची मांडणी करत असताना बहुतांशी वेळा कुठे वाघासोबत तुलना तर कोठे अफजलखानाचा कोथळा बाहेर काढताना, शाहिस्तेखानाची बोटे तोडताना त्या-त्या गोष्टी सुरसपणे सांगितल्या जातात. शिवचरित्र ओघवत्या शैलीत लोकांपर्यंत पोहोचवणे हा त्यांचा हेतू प्रामाणिक असतो; मात्र सातत्याने या गोष्टी पोहोचवल्यामुळे नकळतपणे आपण महाराजांच्या इतर महत्त्वाच्या पैलूंकडे दुर्लक्ष करत असतो. छत्रपती शिवाजी महाराजांनी आपले शौर्य हे गरजेच्या ठिकाणी वापरले आहे. त्यांनी नुसतेच युद्ध आणि त्या अनुषंगाने राज्यव्यवस्था विकसित केली नाही, तर राज्यकारभाराची विधायक रचना निर्माण केली. शिवाजी महाराज मुघलांना लिहिलेल्या एका पत्रात म्हणतात. "... सुज्ञ लोक या रक्ताच्या समुद्राचे (नेहमीच) भय बाळगतात. कारण (या समुद्रातून) कोणालाही आपली नाव सुरक्षितपणे नेता आली नाही."

महाराजांच्या या विधानावरून युद्धाविषयीचा त्यांचा मूलभूत दृष्टिकोन कळतो. त्यांना हिंसा मान्य नव्हती हेदेखील यावरून स्पष्ट होते.

सध्या 'वाकेन पण मोडणार नाही'. 'बघतोस काय मुजरा कर' सारखी चमकदार वाक्ये महाराजांना समोर ठेवून वापरली, प्रचारली जातात. आत्मसन्मान महत्त्वाचाच आहे; पण फाजील आत्मसन्मान, आत्मविश्वास उपयोगाचा नाही. महाराजांनी येथील जनतेसाठी काम करून तो आत्मसन्मान मिळवून दिला. आत्मसन्मानासाठी महाराजांनी त्याकाळी आपले सर्वस्व पणाला लावले. शिवाजी महाराजांच्या कार्यपद्धतीचे निरीक्षण केले असता, हे स्पष्टपणे जाणवते की त्यांची कार्यपद्धती लवचिक होती.

परिस्थितीसापेक्ष निर्णय त्यांनी घेतले आहेत. अभिमान आणि अहंकार यामध्ये आत्मसन्मानासाठी महाराजांनी अभिमानाचा वापर केला केला आहे. शिवरायांच्या कर्तृत्व, कार्य, मूल्य यामुळे लोक नतमस्तक होत आहेत. हे ध्यानात घेतले पाहिजे. सद्य:स्थितीमध्ये आपण आत्मसन्मानाच्या भावनेतून कृती करत आहोत की अहंकाराच्या याचाही विचार केला पाहिजे.

अतिशय कठीण आणि विषम परिस्थितीमध्ये संघर्ष करत शिवरायांसारखे महापुरुष-मानव जन्माला येतात. त्यांच्याकडून आपण आपल्या समाजाला दिशा दाखवणाऱ्या अनेक गोष्टी घेऊ शकतो. शिवरायांचे कार्य जगभरात सर्वदूर पोहोचवण्यासाठी उत्सवाची गरज आहेच; पण त्यासोबतच शिवविचाराचे तरुण पिढीकडून गहन चिंतन होण्याचीही आज खरी गरज आहे.

◆◆◆◆◆



# श्री शंभूछत्रपती

## स्मारक ग्रंथ



संपादक

**सुशांत संजय उदावंत**

स्वराज्यस्मरण ग्रंथमाला
पहिले पुष्प

# श्री शंभूछत्रपती

## स्मारक ग्रंथ

संपादक
सुशांत संजय उदावंत

श्री शंभूछत्रपती
स्मारक ग्रंथ (ऐतिहासिक)
संपादक : सुशांत संजय उदावंत
sushantudawant47@gmail.com
एलोरा पब्लिशिंग हाऊस,
मु. पो. नाथापूर, ता. बीड, जि. बीड
पिन : ४३११२२
संपर्क : ९३५६८४४७४२
इमेल : ellorapublishinghouse@gmail.com
ISBN : 978-93-94979-00-0
मुखपृष्ठ आणि रेखाचित्रे : अजय हातेकर (मो. ९४२३९६२३२४)
अंतर्गत सजावट, मुद्रितशोधन : सारद मजकूर
मुद्रक : दीपक मल्टी ऑफसेट, मुकुंदनगर, पुणे
प्रथम आवृत्ती : १४ मे २०२२
किंमत : ३०० रुपये

© सुशांत संजय उदावंत

प्रस्तुत ग्रंथात प्रसिद्ध केलेल्या लेखामधील मते ही त्या लेखकांची आहेत त्याच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

सर्व कायदेशीर बाबी पुणे न्यायलयीन कक्षेत.

**All rights reserved.**
No parts of this publication may be reproduced, stored in a retrieval system, or transmitted in an
or by any means, electronic, mechanical, photocopying recording, or otherwise, without the prior
permission of the copyright owner, Bushant Udawant.
This book is sold subject to the condition that it shall not, by way of trade or otherwise, be lent, resold,
out, or otherwise circulated without the publisher's prior consent in any form of binding or cover
than in which it is published and without a similar condition including this condition being imposed
subsequent purchaser. Under no circumstances may any part of this book be photocopied for
similarity between the characters and situations within its pages and places or persons, living or
unintentional and co-incidental.

# शंभूराजांचे आरमार आणि जंजिऱ्याची लढाई

प्रा. डॉ. जितेंद्र कदम

इ. स. १६५५-५६ च्या सुमारास छ. शिवाजी महाराजांनी जेव्हा जावळी ताब्यात घेतली त्यावेळी रायगड किल्ला स्वराज्यात आला होता. रायगडाच्या पश्चिमेला असणारा कोकण किनारा आणि अरबी समुद्र छ. शिवाजी महाराजांना राज्यकारभाराच्या सीमा वाढविण्यासाठी खुणवू लागला. कारण पोर्तुगीज, इंग्रज आणि सिद्दी यांच्या परकीय आक्रमणांपासून हिंदुस्थानला वाचवायचे असेल तर स्वतःचे आरमार हवे, हे शिवाजी महाराजांनी स्वराज्य स्थापनेच्या वेळेस ओळखले होते. भारतातील राजकर्त्यांची नौकानयनाची परंपरा जास्त करून शांततापूर्ण व्यापारी स्वरूपाची होती. शिवाय इंग्रज, डच, पोर्तुगीज किंवा सिद्दी यांच्याकडून आरमार उभे करण्याची महत्त्वाची विद्या राजेंना मिळणे अशक्य होती.' आरमार म्हणजे एक स्वतंत्र राज्यअंगच आहे. ज्याच्याजवळ आरमार त्याचा समुद्र हे महत्त्व छ. शिवाजी महाराजांपासून छ. संभाजीराजेंनीही ओळखले होते.

शिवरायांनी उभारलेल्या आरमाराला संभाजीराजांनी जाणीवपूर्वक बळकटी दिली. सिद्दी, डच, पोर्तुगीज, इंग्रज अशा या सर्व बलाढ्य शत्रूंकडील आरमाराची ताकद फार मोठी होती. अशा या मातब्बर शत्रूचा बंदोबस्त करण्यासाठी अनेक लहान-मोठी लढाऊ जहाजांची बांधणी संभाजी महाराजांनी करून घेतली. त्यामध्ये गुराबा, तरांडी, गलबते, दुबारे, शिबाडे, पढाव, मचवे, बाशीर, तीरकटी, पाल इ. यांमधील मोठ्या जहाजांमध्ये लांब पल्ल्याच्या तोफा बसविल्या. समुद्री किल्ल्यावरचे सैन्य वाढविले. त्याचबरोबर समुद्रमार्गे मध्यपूर्वेशी नियमित व्यापार सुरू केला. त्यामुळे स्वराज्याचा व्यापार वाढू लागला.

संभाजीराजांच्या आरमारात प्रामुख्याने मुस्लिम, भंडारी, कुणबी व आगरी

# भारतीय लोकशाही

## (समकालीन परिप्रेक्ष्य)

75 भारत अमृत महोत्सव

हर राह पर बढ़ते कदम

PRINCIPLES OF INDIAN DEMOCRACY

DEMOCRACY IN INDIA



संपादक

**डॉ. संदीप बी. काळे**

# भारतीय लोकशाही (समकालीन परिप्रेक्ष्य)

■ डॉ. संदीप बी. काळे

■ प्रथम आवृत्ती – २६ नोव्हेंबर,२१

© प्रकाशक व संपादक

■ प्रकाशक

आधार पब्लिकेशन, अमरावती.

हनुमान मंदिराजवळ, पाठ्यपुस्तक मंडळा समोर,

वि.म.वि.कॉलेज मागे, अमरावती

मो. ९५९५५६०२७८

email- aadharpublication@gmail.com

■ मुखपृष्ठ संकल्पना

विलास पवार

सरिता ग्राफिक्स, अमरावती

■ अक्षरजुळवणी

सरिता ग्राफिक्स,

कठोरा रोड, अमरावती

■ Price : 200/-

ISBN-978-93-91305-38-3

सुचना.- सदर अंकामध्ये प्रकाशित झालेल्या लेखास, संपादक, प्रकाशक, मालक, मुद्रक जबाबदार राहणार नाही. या अंकामध्ये प्रकाशित झालेले लेख लेखकाचे त्यांचे वैयक्तिक मत आहे.

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | लेख / लेखक | पु.क्र. |
| --- | --- | --- |
| 1 | भारतीय लोकशाही व महिला सक्षमीकरण<br>डॉ. दिपाली श्रीराम घोगरे | 1 |
| 2 | संविधानातील मार्गदर्शक तत्वासंदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा दृष्टीकोण<br>डॉ.ए.बी.जाधव | 8 |
| 3 | शिक्षण व महिला सबलीकरण<br>श्री पांचाळ देविदास श्रीनिवासराव | 18 |
| 4 | आधुनिक भारतीय लोकशाहीच्या वस्तुस्थितीचे अध्ययन<br>प्रा. सि. के. भोवते | 24 |
| 5 | भारतीय संविधानाच्या प्रस्तावनेतील तत्वज्ञान<br>प्रा. उज्वला रावसाहेब प्रधान | 32 |
| 6 | मूलभूत हक्कांचे भारतीय लोकशाहीतील महत्व<br>देवेंद्रसिंग नरसिंग सोळंके | 42 |
| 7 | लोकशाही व मूलभूत कर्तव्य<br>प्रा.डॉ.उमेशकुमार पी. शहारे | 59 |
| 8 | भारतीय संविधानाचे उद्देशिकेचे तत्वज्ञान'' : एक चिकित्सक अध्ययन<br>डॉ. सुभाष दौलतराव उपाते | 67 |
| 9 | भारतीय लोकशाहीत प्रादेशिक राजकीय पक्षांची भूमिका<br>प्रा. डॉ. दिनकर संतुकराव कळंबे | 80 |
| 10 | भारतीय संविधानातील राज्यनिती मार्गदर्शक तत्त्व<br>प्रा. विजय गावंडे | 90 |
| 11 | आरोग्य – एक मुलभूत हक्क<br>प्रा. डॉ. सरला वसंतराव मेश्राम | 97 |

# संविधानातील मार्गदर्शक तत्वासंदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा दृष्टीकोण

डॉ.ए.बी.जाधव

राज्यशास्त्र विभाग शहाजीराजे महाविद्यालय,

खटाव, जि.सातारा

**प्रस्तावना :**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना जनतेच्या सर्वांगीण उन्नतीसाठी उद्दिष्टांच्या प्रारुपाद्वारे निश्चित स्वरुपाच्या योजना आखून त्यांची प्रभावीपणे अंमलबजावणी करायची होती. भारतीय समाजात आर्थिक–सामाजिक न्याय प्रस्तावित करायचा होता. संविधानाच्या चौथ्या भागात राज्याच्या धोरणासंबंधी मार्गदर्शक तत्वे दिलेली आहेत. यामधून संविधानाचे नैतिक आणि राजकीय पैलू अधिक ठळकपणे स्पष्ट होतात. व्यक्तीच्या मूलभूत हक्कांची सुरक्षितता आणि कल्याणासाठी संविधानाच्या मूलभूत तत्वांची प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्यासाठी राज्याने काय करावे याचे निर्देश कलम ३६ ते ५१(क) मध्ये दिलेले आहेत. भारताचा विकास नैतिकतेच्या आधारे सामाजिक न्यायाच्या उद्देशाने व्हावा यासाठी निती निर्देशक तत्वे संविधानात समाविष्ट करण्यात आलेली आहेत. शासनाचे अधिकार क्षेत्र शक्य तेवढे मर्यादित असावे आणि व्यक्तीला स्वत:चा विकास घडवून आणण्याचे स्वातंत्र्य द्यावे असे ते धोरण होते. त्या काळात ज्या राज्यघटना निर्माण झाल्या त्यात व्यक्तीचे स्वातंत्र्य, तिचे मूलभूत हक्क यांनाच महत्व होते.पण भारताची राज्यघटना ही विसाव्या शतकात निर्माण झालेली राज्यघटना आहे. विसाव्या शतकात कल्याणकारी राज्याच्या कल्पनेचा उदय झाला. त्या